# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २३.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २२.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ११,७९०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून ९८५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१५० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८८,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—**

दिनांक २८.०९.२०२२ चे २२.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत राहणारे ३५ वर्षीय फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन पुतणी हीने राहते घरी ‘‘टेलरकडे कपडे शिवायला जाते’’ असे सांगून, घरुन निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तीचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तीचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे कलम ३६३ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना दिनांक २२.०५.२०२६ रोजी माहीती मिळाली की, नमुद मुलगी ही दिल्ली येथून नागपूरला रेल्वेने येत आहे. अशा प्राप्त माहीतीवरून, रेल्वे स्टेशन परिसरात नमुद मुंलीचा शोध घेतला असता, ती मिळून आल्याने तिला ताब्यात घेतले. तिची सविस्तर विचारपूस करुन, तिचे समुपदेशन करण्यात आले. मुलीला पुढील कारवाईस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी नागपुर शहरचे मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हे), मा. श्री. राहुल माकणीकर पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनात मपोनि. ललीता तोडासे, सफौ. दिपक बिंदाणे, पोहवा. सचिन श्रीरामे, सुनिल वाकडे, राम निरगुडवार, पोअं. ऋषीकेश डुमरे, मपोअं. अश्वीनी खोडपेवार व पल्लवी वंजारी यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हिंगणा :— जिवे ठार मारणारा आरोपी भाऊ ताब्यात.**

फिर्यादी सौ. राईबाई बाबुलाल पंधराम, वय ६० वर्ष, रा. कटंगधरा, पोस्ट आमगाव देवळी, ता. हिंगणा, जि. नागपूर यांना १) हरीश्चंद्र बाबुलाल पंधराम, वय ३४ वर्ष व २) शुभम बाबुलाल पंधराम, वय २८ वर्ष, असे दोन मुले आहेत. लहान मुलगा शुभम याचे मागील चार वर्षापुर्वी लग्न झाले होते. सध्या त्याची पत्नी सोबत राहत नसून त्यांच्यात सोडचिठ्ठी झालेली आहे. मोठा मुलगा हरिश्चंद्र हा काहीही कामधंदा करीत नसल्याने लहान भाऊ शुभम त्यास नेहमी समजावित असे. दिनांक २२.०५.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, दोन्ही भावांमध्ये कामधंदा करीत नसल्याचे कारणावरुन वाद झाला होता. तेव्हा त्यांचे वडीलांनी हरिश्चंद्र यास बाहेर जायला सांगितल्याने तो घराबाहेर निघुन गेला होता. फिर्यादी, त्यांचे पती व लहान मुलगा शुभम हे अंगणात झोपले असतांना, दिनांक २३.०५.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, आरोपी हरिश्चंद्र बाबुलाल पंधराम याने लहान भाऊ शुभम हा वारंवार कामधंद्याबाबत बोलतो तसेच, झालेल्या वादाचा राग मनात धरुन, त्याने शुभम यास जिवानिशी ठार मारण्याचे उद्येशाने, तो झोपेत असतांना त्याचे डोक्यावर लाकडी दांड्याने मारहाण करुन, रक्तबंबाळ करून जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि. वसंत शेळमाके ९८५००८१३७५ यांनी आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन व त्वरीत दखल घेतली. आरोपींचा शोध घेऊन आरोपीस ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :— जिवे ठार मारणारा आरोपी व विधीसंघर्षीत बालक ताब्यात.**

फिर्यादी दुर्गाशंकर रतनसिंग ठाकूर, वय ७० वर्ष, रा. सुंदरलाल खडवळे चे घरी किरायाने, त्रिकोणी पार्क, सद्भावना नगर, नागपूर यांचा मुलगा संजय उर्फ मोनू दुर्गाशंकर ठाकूर, वय ३२ वर्ष हा दिनांक २२.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत गली क्र. १, नंदनवन झोपडपट्टी, मारीमुत्तु अम्मन मंदीर जवळ, सदाशिव नायडू यांचे घरासमोर हजर जात असता, आरोपी आयुष जयपाल लूडेलकर, वय २२ वर्ष, रा. गंगाबाई घाट, स्विपर कॉलनी, लकडगंज, नागपूर व त्याचा साथीदार विधिसंघर्षीत बालक यांनी जुन्या भांडणाचे कारणावरुन, संगनमत करून, संजय यास जिवे ठार मारण्याचे उद्येशाने त्याचे छातीवर, पोटावर चाकूने वार केले तसेच, डोक्यावर दगडाने मारुन गंभीर जखमी केले. लोकांनी गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे सपोनि. राठोड ९५९५४६४३१२ यांनी आरोपी व विधीसंघर्षीत बालकाविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता त्वरीत दखल घेतली. आरोपीचा शोध घेऊन, आरोपी व विधिसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** दिनांक २२.०५.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, विटाभट्टी चौक, फिरोज गांधी शाळेसमोरील बोअरवेल जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे ज्यांनी अंगात पांढरे रंगाचा सॅन्डो बनियान व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेले ते बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी चंद्रशेखर रामू कुंवरदादरा, वय ५३ वर्ष, रा. विनोबा भावे नगर, गली क्र. ३०, घर क्र. १०५३, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि. संतोष मुंडे ९९६७११२०३१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :–** धनश्री अमृत निमजे, वय २६ वर्षे, रा. तायवाडे नगर, सोमनाथ पॅलेस, प्लॉट क्र. १०१, बेलतरोडी, नागपूर ह्या दिनांक ०७.०५.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी बंगलोर येथे इंटरव्युकरीता जाते म्हणून घरुन गेल्या. आजपावेतो घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. **वर्णन**– रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट, डोळे–काळे, अंगात– जिन्स पॅन्ट व टि–शर्ट घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी/इंग्रजी बोलतात.



धनश्री

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**